# सद्यःस्थितीत हळदीमध्ये करावयाचे व्यवस्थापन

डॉ. मनोज माळी

**हळदीच्या दोन्ही गड्ड्यांमधील मोकळ्या जागेमधील माती १.५ ते २ इंच शिपीच्या कुदळीने खणून दोन्ही बाजूच्या गड्ड्यांना लावणे म्हणजेच भरणी करणे होय. भरणी केल्यामुळे नवीन येणारी हळकुंडे झाकली जाऊन त्यांची चांगली वाढ होते. भरणी केल्यामुळे उत्पादनामध्ये वाढ मिळण्यास मदत होते.**



हळदीला आलेले फुलांचे दांडे काढू नयेत.



योग्यरीत्या भरणी न केल्यास हळकुंड उघडे राहून सूर्यप्रकाशामुळे खराब होतात. अशा कंदावर कंदमाशीचा प्रादुर्भाव लवकर होतो.

सद्यःस्थितीत हळद लागवड होऊन सात महिन्यांचा कालावधी (२१० दिवस) पूर्ण झाला आहे. या कालावधीमध्ये हळद पिकात हळकुंड भरणे ही महत्त्वाची अवस्था सुरू झालेली असते. या अवस्थेत हळकुंडांची जाडी आणि वजन वाढण्यास मदत होत असते. नव्याने आलेल्या फुटव्यांपासून हळकुंड भरण्याचा हा कालावधी असतो. या वेळी वातावरणातील तापमानात घट होत असते. वातावरणात साधारणतः १८ ते २० अंश सेल्सिअस तापमान असते. प्रकाश संश्लेषण क्रियेतून पानांत तयार झालेले अन्नद्रव्ये खोडाद्वारे हळकुंडापर्यंत पोहोचविले जाते. त्यामुळे पिकाची पाने निरोगी राहणे अत्यंत गरजेचे असते.

हळद पिकाच्या योग्य वाढीसाठी सद्यःस्थितीत आंतरमशागतीची कामे वेळेवर करणे गरजेचे आहे. या कामांमध्ये अन्नद्रव्ये व्यवस्थापन, सिंचन व्यवस्थापन, तणांचे नियंत्रण, फुलांचे दांडे न काढणे इत्यादी महत्त्वाच्या कामांचा समावेश होतो. तापमान जास्तच कमी झाले तर हळद पिकांवर विविध किडी-रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. त्यामुळे गड्ड्यांची संख्या आणि आकार यावर परिणाम होतो. यामुळे एकूण हळकुंडाच्या उत्पादन आणि गुणवत्तेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता अधिक असते. त्यासाठी सद्यःस्थितीत हळद पिकांत नियोजित कामे वेळेवर पूर्ण करणे अत्यंत आवश्यक आहे.

## आंतरमशागत (भरणी करणे)

- हळद पिकाला मातीची भर लावलेली नसेल तर फुटव्यांपासून नव्याने आलेले हळकुंड उघडे राहतात. हळकुंड सूर्यप्रकाशाच्या सान्निध्यात राहिल्यास हिरवे पडून वाढ खुंटते. तसेच कंदमाशीसारख्या किडी उघड्या हळकुंडावर किंवा गड्ड्यांवर अंडी घालतात. त्यामुळे कंदकुज रोगाचा प्रसार होतो. त्यामुळे भरणी करायची राहिली असल्यास तत्काळ मातीची भर लावून हळकुंडे संपूर्णपणे झाकून घ्यावीत. त्यामुळे हळकुंडांचे चांगले पोषण होऊन ती चांगली पोसतात.
- हळदीच्या दोन्ही गड्ड्यांमधील मोकळ्या जागेमधील माती १.५ ते २ इंच शिपीच्या कुदळीने खणून दोन्ही बाजूच्या गड्ड्यांना लावणे म्हणजेच भरणी करणे होय. भरणी केल्यामुळे नवीन येणारी हळकुंडे झाकली जाऊन त्यांची चांगली वाढ होते. भरणी केल्यामुळे उत्पादनामध्ये वाढ मिळण्यास मदत होते.
- गादीवाफ्यावर भरणी करताना पॉवर टिलरच्या साह्याने किंवा दोन गादीवाफ्यांमधील जागेतील माती मोकळी करून करून गादीवाफ्यावर भर द्यावी. त्यामुळे मजुरांच्या खर्चात बचत होण्यास मदत होते. गादीवाफ्यावर ठिबक सिंचन केले असल्यास भरणी करताना ड्रिपर मातीखाली जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

## अन्नद्रव्ये व्यवस्थापन

शाकीय वाढ पूर्ण झाल्यानंतर हळद पिकास कोणतेही नत्रयुक्त रासायनिक खत जसे युरिया देऊ नये. युरियासारखी खते दिल्यास हळदीची अतिरिक्त शाकीय वाढ होते. परिणामी हळद पिकाची पुढील अवस्था जसे हळकुंड भरणे, हळकुंडाची जाडी आणि वजन वाढणे लांबणीवर पडते. ज्याठिकाणी पोटॅशयुक्त खतांची कमतरता असेल तेथे हेक्टरी १२५ किलो पांढरा पोटॅश द्यावा. त्यामुळे हळकुंडांचे वजन वाढून हळकुंडांना चकाकी येते.

## सिंचन व्यवस्थापन

- - हळद पिकात उत्पन्नाचा मुख्य स्रोत जमिनीत वाढणारे कंद असल्यामुळे मातीचे प्रमाण, सेंद्रिय पदार्थ, हवा आणि पाणी यांचे संतुलन राखावे. जमिनीत केवळ मातीचे कण राहिले तर जमीन कोरडी होऊन मुळांच्या वाढीला वाव मिळत नाही. जमिनीत पाणी जास्त झाले तर जास्त ओलाव्यामुळे कंद कुजण्याचे प्रमाण वाढते.
- - रुंद वरंबा पद्धतीने लागवड असल्यास ठिबक सिंचनाचा वापर अत्यंत फायदेशीर ठरतो. ठिबक सिंचनाच्या वापरामुळे पाण्याचा अपव्यय टळून जमिनीचे जैविक गुणधर्म सुधारण्यास मदत होते. मुळांपाशी जमिनीमध्ये वाफसा लवकर आणि जास्त तयार होतो, सूक्ष्मजीवांच्या क्रिया सुधारतात. मातीची सच्छिद्रता आणि
- जलधारणक्षमता वाढते. त्यामुळे अन्नद्रव्यांचे वहन सुलभ होऊन हळद पिकांच्या मुळांद्वारे शोषण अधिक होते. याचे एकूण परिणाम पिकावर दिसून येतात. सूक्ष्म पाने लवकर मोठी होतात, हळद उत्पादनात वाढ होऊन हळदीचा मुख्य गुणवत्ता घटक कुरकुमीनचे (रंजक द्रव्य) प्रमाण वाढण्यास मदत होते.
- जमिनीतील ओलाव्यानुसार ठिबक संच चालू ठेवावा. सतत पाणी सोडू नये. सतत ओलावा राहिल्याने हळकुंडे कुजण्याची शक्यता असते. ठिबक सिंचनाने पाणी दिल्यास उत्पादन वाढीस चालना मिळते.
- सद्यःस्थितीत पाण्याच्या दोन पाळ्यांमधील अंतर १२ ते १५ दिवसांचे ठेवावे. पाऊस समाधानकारक असेल तर हलक्या ते मध्यम जमिनीत पाण्याच्या १३ ते १५ पाळ्या द्याव्या लागतात. शिफारशीत मात्रेपेक्षा पाण्याचे प्रमाण कमी पडले तर हळदीच्या कंदांची योग्य वाढ होत नाही. प्रक्रियेनंतर अशा हळकुंडांचा रंग फिका पडतो, चमक घटते. हळद पिकास आठ महिने होईपर्यंत जमिनीच्या मगदूराप्रमाणे सिंचनाचे नियोजन करावे. कंद पोसण्याच्या कालावधीमध्ये पिकाची पाण्याची गरज मर्यादित होत जाते.

## फुलांचे दांडे न काढणे

शाकीय वाढ पूर्ण झाल्यानंतर हळदीला फुले येण्यास सुरुवात होते. काही जातींना जास्त, तर काही जातींना कमी प्रमाणात फुलांचे दांडे येतात. हळदीला फुले येणे म्हणजे हळदीच्या शाकीय वाढीचा कालावधी संपून कंद सुटण्यास सुरुवात झाल्याचे लक्षण असते. फुलांचे दांडे तसेच झाडावर ठेवल्यास हळद पिकाला त्याचा कोणताही तोटा होत नाही. फुलांचे दांडे काढणे ही प्रक्रिया खर्चिक आहे. संशोधनानुसार हळद पिकावर फुलांचे दांडे असल्यामुळे उत्पादनात कोणत्याही प्रकारे घट येत नाही, असे निदर्शनास आले आहे. तसेच फुलांचे दांडे ही न संपणारी क्रिया आहे. त्यामुळे एकदा दांडे काढले तरी ते नव्याने येतच राहतात. फुले काढताना हळद पिकाच्या खोडाला इजा होते. या जखमेतून दुय्यम बुरशींचा पिकात शिरकाव होऊन कंदकुज रोगाचा प्रादुर्भाव होऊ शकतो. त्यासाठी हळदीला आलेली फुले काढू नयेत.

– डॉ. मनोज माळी, ९४०३७७३६१४

(लेखक महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत हळद संशोधन केंद्र, क. डिग्रज, जि. सांगली येथे प्रभारी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.)

छोट्या जाहिराती

क्लासिफाइड: तेरा ओळींसाठी फक्त ५०० रुपये, पुढील प्रत्येक जादा ओळीस रु. ८५/-

विशेष योजना: २ पेड + १ फ्री, ३ पेड + २ फ्री, ५ पेड + ५ फ्री, १०पेड + १२ फ्री

**बी - बियाणे**

**बियाणे / रोपे विक्री**

एकरामध्ये 2/3 लाखापेक्षा कुणीही जास्त कमवत नाही त्यापेक्षा खजुर लावा एकरी उत्पन्न 20-30 लाख रूपये ओरिजनल टिशू कल्चर (Datepalm) खजूर रोपे उपलब्ध सं. 8806120199 वैष्णव सर 7397971684 राधेशंकर शहा.

**व्यवसायविषयक**

**व्यवसाय धंदा**

त्वरा करा!! त्वरा करा !! "बोरचार्जर" या बोअरवेलचे पाणी वाढविणाऱ्या पेटंटेड तंत्रज्ञानासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यासाठी एक डिलरशिप देणे आहे. संपर्क : 9117178080. info@urdhvam.com

**नोकरीविषयक**

**नोकरी देणे**

शेती कामासाठी निर्व्यसनी जोडपे पाहिजे राहण्याची सोय आहे ट्रॅक्टर, टू व्हीलर चालवता येणे आवश्यक आहे. अर्जंट मध्ये. तालुका शिरूर जिल्हा, पुणे येथे पाहिजे. संपर्क 9356979102 /9156008099

**वाचकांसाठी निवेदन**

सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत 'सकाळ' व्यवस्थापन हमी देऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी. - व्यवस्थापक

**जाहिरातीसाठी संपर्क**

- पुणे - शितल - ९९७५७६५८३८
- सातारा- अजिंक्य-८९५६१३२५९५
- सांगली -शितल- ९८८११२९२९३
- नाशिक- चेतन-९१६८६६११५८
- छ. संभाजीनगर- दत्ता८६२४०२३२५६
- अहमदनगर-मारुती- ८३९०५६९५१३
- नागपूर - प्रशांत- ८८८८७१८६००
- अकोला - महेश-९०११०६१९३३
- जळगाव- भूषण-९९६०४११११६
- सोलापूर - रोहित-९६५७३६०३४६

अॅग्रोवन, सकाळ मिडिया प्रा. लि. ५९५, बुधवार पेठ, पुणे ४११००२

फोन ०२० - २४४०५८४४/४५, Email - advt.agrowon@esakal.com